# स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त महिला महाविद्यालयात तरुणाईचा जागर

**अमरावती दि ११. :**नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित स्थानिक महिला महाविद्यालय येथे ईसीई इंडिया फाउंडेशन ,स्वावलंबी भारत अभियान आणि महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता महाविद्यालयाच्या नवीन ऑडिटोरियम येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त जागर तरुणाईचा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख वक्ते म्हणून नागपूरच्या श्रीमती गौरीताई खैर, विदर्भ विकास प्रवासी कार्यकर्ता, विवेकानंद केंद्र, नागपूर या असून कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. अमित आरोकार, संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक ईसीई इंडिया फाउंडेशन व ईसीई इंडिया एनर्जी, अमरावती हे असणार आहे. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील उपस्थित राहतील. स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणात्मक विचाराने महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वात व जीवनात निश्चितच सकारात्मक बदल घडून येईल. त्यामुळे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींनी या व्याख्यानाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील यांनी केले आहे.



सदर उपक्रम हा ईसीई इंडिया या कंपनीच्या ईसीई इंडिया फाउंडेशनच्या सामाजिक दायित्वाच्या भूमिकांमधून आयोजित केला जातो आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये तरुण वर्ग शक्यतोवर व्याख्याना सारख्या बौद्धिक कार्यक्रमापासून दूर असतो हे लक्षात घेऊन व्याख्यात्यांना महाविद्यालयापर्यंत पोहोचविणे व विद्यार्थिनींना उद्बोधन करणे हा हेतू या कार्यक्रमाच्या आयोजनाचा या व्याख्यानमालेच्या मालिकेतील पहिला कार्यक्रम महिला महाविद्यालयात होणार आहे. पुढील महिन्यापासून अमरावती जिल्ह्यातील अन्य महाविद्यालयामध्ये देखील असे कार्यक्रम घेण्याचा ईसीई फाउंडेशनचा मानस आहे असे अमित आरोकर यांनी सांगितले आहे.